# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**<u>अत्यंत तातडीचे/महत्वाचे</u>**

क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/६०/२०२१
दिनांक : ०२/०२/२०२१

प्रति,

प्राचार्य / विभागप्रमुख / मानद संचालक,
सर्व संलग्नीत संबंधीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी व पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग
मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा.

**विषय : शैक्षणिक सत्र २०२०-२१ पासून सर्व अभ्यासक्रमाला नियमित प्रवेशित विद्यार्थ्यांचे नामांकन आवेदनपत्रे ऑनलाईन भरण्याबाबत तसेच हिवाळी-२०२० पासून सर्व अभ्यासक्रमाला नियमित प्रवेशित विद्यार्थ्यांचे (विषम सत्रांचे) परीक्षांचे परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्याबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०२०-२१ पासून सर्व अभ्यासक्रमाला नियमित प्रवेशित विद्यार्थ्यांचे नामांकन आवेदनपत्रे ऑनलाईन भरण्याबाबत तसेच हिवाळी-२०२० पासून सर्व अभ्यासक्रमाला नियमित प्रवेशित (विषय सत्रांचे) विद्यार्थ्यांचे परीक्षांचे परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन विद्यापीठात सादर करावयाचे आहेत.

नामांकन आवेदनपत्रे ऑनलाईन तसेच ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे भरण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करावयाची आहे.

**<u>ऑनलाईन नामांकन :-</u>**

१) नामांकन आवेदनपत्रे अचूक भरण्याकरीता सर्व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन नामांकन आवेदनपत्रे महाविद्यालयातूनच भरण्यात यावे.

२) ज्या महाविद्यालयांना उपरोक्त कामे करण्याकरीता यापूर्वी में.लर्निंग स्पायरल कंपनीकडून Login ID आणि Password उपलब्ध झाले नाहीत, अशा महाविद्यालयांनी त्यांचे महाविद्यालयाचे Login ID आणि Password विद्यापीठाकडून प्राप्त करुन घेण्यात यावे.

३) महाविद्यालयाला उपलब्ध झालेल्या Login ID आणि Password ने https://sgbau.ucanapply.com या संकेतस्थळावर जाऊन College च्या Tab वर Click करुन आपल्या महाविद्यालायाच्या Login ID आणि Password ने Login करुन New Admission या Panel वर जाऊन विद्यार्थ्यांचे नामांकन आवेदनपत्र ऑनलाईन प्रक्रियेने भरण्यात यावे.

४) महाविद्यालयानी शैक्षणिक सत्र-२०२०-२१ मध्ये नामांकन करण्यासाठी प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन Registration करतांना विद्यार्थ्यांचा E-mail ID हाच विद्यार्थ्यांचा ऑनलाईन प्रक्रियेसाठी Login ID शेवटपर्यंत राहील. (पुढील सर्व परीक्षांकरीता पदवीप्रमाणपत्रे प्राप्त होईपर्यंत परीक्षा आवेदनपत्रे भरण्याकरीता)

५) विद्यार्थ्यांचे नामांकन आवेदन पत्र भरत असतांना आपल्या महाविद्यालयात प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांचे संबंधीत अभ्यासक्रमाला घेतलेले विषय अचूक भरावेत.

६) ऑनलाईन नामांकन प्रक्रिया करतेवेळी नामांकन आवेदनपत्रे अर्धवट भरला असेल तर तो पूर्ण करण्याकरीता ऑनलाईन Registration करतेवेळी तयार झालेला E-mail ID आणि Password द्वारे पुन्हा लॉगीन करुन Toggle हे बटन on करुन Continue करुन अर्धवट भरलेले नामांकन आवेदनपत्रे पूर्ण करण्यात यावे.

७) विद्यार्थ्यांचे ऑनलाईन नामांकन आवेदनपत्रे ऑनलाईन प्रक्रियेद्वारे भरल्यानंतर अशा विद्यार्थ्यांचे Login ID आणि Password महाविद्यालयाच्या ऑनलाईन पोर्टलवर परीक्षा आवेदनपत्रे भरण्यासाठी Student Login Details या Panel वर परीक्षेनिहाय उपलब्ध होतील. (विद्यार्थी Login ID आणि Password विसरल्यास

८) विद्यार्थ्यांचे नामांकन आवेदनपत्र ऑनलाईन भरल्यानंतर महाविद्यालयाने Student Verification या Panel वर जाऊन संबंधीत परीक्षेची माहिती भरुन Form Type मध्ये Enrollment Select करुन विद्यार्थ्यांचे नामांकन आवेदन पत्रे Verified करणे अनिवार्य राहील.

९) एखाद्या विद्यार्थ्याचे अनावधानाने दोन ऑनलाईन नामांकन आवेदनपत्रे भरली असेल, तर अशा वेळी महाविद्यालयाने एकच ऑनलाईन नामांकन आवेदनपत्र Verified करुन दुसरा Reject करावा.

१०) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे ऑनलाईन नामांकन आवेदनपत्र Verified करुन विद्यार्थ्यांची यादी Report Section मधून Student Verification मध्ये जाऊन Enrollment Select करुन विद्यार्थ्याने ऑनलाईन नामांकन आवेदन पत्र भरल्याची यादी काढावी. (महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे नामांकन आवेदनपत्राची Print out विद्यापीठात जमा करु नये.)

११) Verification झाल्यानंतर नामांकनाची यादी विहित केलेल्या नामांकन शुल्कासह विद्यापीठात सादर करावा.

**<u>ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे :-</u>**

१) विद्यार्थ्यांनी आपले ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र त्यांना महाविद्यालयाने वितरित केलेल्या Login ID आणि Password द्वारेच भरण्यात यावे.

२) विद्यापीठाद्वारे तयार करण्यात आलेल्या नियमित विद्यार्थ्यांचे Login ID आणि Password महाविद्यालयाने त्यांच्या पोर्टलमध्ये Login करुन सर्व विद्यार्थ्यांचे Login ID आणि Password Student Login Details या Panel वरुन परीक्षेनिहाय उपलब्ध करुन घ्यावेत, व विद्यार्थ्यांना वितरित करण्यात यावे.

३) Panel वर उपलब्ध झालेल्या विद्यार्थ्यांचे Login ID आणि Password महाविद्यालयातील सर्व संबंधीत विद्यार्थ्यांना पुरविण्यात यावेत. परंतु विद्यार्थ्याचा Login ID आणि Password त्याच विद्यार्थ्याला देण्यात यावा. इतर विद्यार्थ्यांना त्याचा Login ID आणि Password माहिती होणार नाही, याबाबतची दक्षता महाविद्यालयाने घ्यावी.

४) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या Login ID आणि Password द्वारे **https://sgbau.ucanapply.com** या संकेतस्थळावर जाऊन Student या Tab वर Click करुन आपल्या Login ID आणि Password ने Login करुन ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे भरण्यात यावे. व विद्यार्थ्यांनी सदर भरलेल्या परीक्षा आवेदनपत्राची Print out काढून परीक्षा शुल्कासह महाविद्यालयात जमा करावी. **{विद्यार्थ्यांनी आवेदनपत्राची Print out काढून महाविद्यालयात जमा न केल्यास विद्यार्थ्यांना परीक्षा क्रमांक (Roll No.) प्राप्त होणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.}**

५) विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन भरल्यानंतर व विद्यार्थ्याकडून परीक्षा आवेदनपत्राची Print out काढून व परीक्षा शुल्क प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयाने Student Verification या Panel वर जाऊन संबंधीत परीक्षेची माहिती भरुन Form Type या Option ला प्रेस करुन Exam Form Select करुन विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्रे Verified करणे अनिवार्य राहील. (महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे Verified केल्याशिवाय परीक्षा क्रमांक (Roll No.) जनरेट होणार नाही, याची नोंद घ्यावी.)

६) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र Verified करुन विद्यार्थ्यांची यादी Report Section मधून Student Verification मध्ये जाऊन Exam Form Select करुन विद्यार्थ्याने ऑनलाईन परीक्षा आवेदन पत्र भरल्याची यादी काढावी.

७) Verification झाल्यानंतर परीक्षा आवेदनपत्रांची यादी विहित केलेल्या परीक्षा शुल्कासह व विहित केलेल्या तारखेच्या आंत विद्यापीठात सादर करावी. (महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे परीक्षाआवेदनपत्राची Print out विद्यापीठात जमा करु नये.)

८) ज्या नियमित विद्यार्थ्यांना ऑनलाईन हिवाळी-२०२० करीता परीक्षा आवेदनपत्र भरण्याकरीता Login ID आणि Password महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले नसतील (Gap Students), अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात जाऊन ऑनलाईन पोर्टलमार्फत Registration करुन महाविद्यालयाकडून Login ID आणि Password घेण्यात यावा.

९) उपरोक्त ८ करीता महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२० परीक्षांचे परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन भरण्याकरीता महाविद्यालयांनी त्यांच्या Login ID ने Login करुन Confidentail Section Panel वर क्लिक करुन Gap Student Registration वर जाऊन अशा विद्यार्थ्यांचे सर्वप्रथम Registration करणे आवश्यक आहे. Registration करतेवेळी विद्यार्थ्यांचा E-mail ID व नवीन Password टाकणे आवश्यक

राहील. विद्यार्थांच्या E-mail ID वर आलेला Activation Code Activate करुनच विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन भरता येईल. व सदर E-mail ID व Password हाच विद्यार्थ्यांचा Login ID व Password परीक्षा आवेदनपत्रे भरण्याकरीता कायम राहील.

१०) हिवाळी-२०२० करीता नियमित विद्यार्थ्यांनी जर ऑफलाईन परीक्षा आवेदनपत्रे सादर केली असतील, तर ती स्वीकारण्यात येणार नाही. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील. त्याकरीता नियमित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे सादर करणे अत्यावश्यक आहे.

**(टिप-**

१. शैक्षणिक सत्र २०२०-२१ करीता ज्या विद्यार्थ्यांचे नामांकन अर्ज ऑनलाईन भरल्या गेल्या असतील अशा सर्व विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२० परीक्षांचे परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन भरण्याकरीता विद्यार्थांनी प्राप्त झालेला Login ID व Password ने **https://sgbau.ucanapply.com** या लिंकवर जाऊन Student या Tab वर जाऊन Login करुन I just confirmed वर Click करुन परीक्षा आवेदनत्राची प्रत काढण्यात यावी. व सदर परीक्षा आवेदनपत्राची प्रत व विहित केलेले शुल्क महाविद्यालयात जमा करण्यात यावे.

२. ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी-२०२० परीक्षेकरीता सत्र-१ व २ या अभ्यासक्रमाचे ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे सादर केले असतील, अशा विद्यार्थ्यांनी जुन्याच Login ID आणि Password द्वारे हिवाळी-२०२० परीक्षेतील सत्र-३ अभ्यासक्रमाचे परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईनद्वारे सादर करावीत.

३. ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी-२०२० परीक्षेपर्यंत परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन प्रणालीद्वारे (मे.लर्निंग स्पायरल कंपनीच्या पोर्टलमार्फत) भरले असतील, असे विद्यार्थी वगळून इतर सर्व माजी विद्यार्थ्यांनी (Backlog) ऑफलाईन पद्धतीने परीक्षा आवेदनपत्रे संबंधित महाविद्यालयात जमा करावी. व महाविद्यालयांनी विद्यापीठात सादर करावे.
(उदाहरणार्थ-हिवाळी-२०२० परीक्षेकरीता पाचव्या सत्राच्या नियमित विद्यार्थ्यांचा तिसऱ्या सत्राचा बॅकलॉग असल्यास अशा विद्यार्थ्याचा बॅकलॉग परीक्षेचे परीक्षा आवेदनपत्रे ऑफलाईन द्वारे प्रचलित पद्धतीने (हिरव्या रंगाचा फार्म) भरण्यात यावे.

४. बहिःशाल विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे ऑफलाईन पद्धतीनेच महाविद्यालयाने स्वीकारून विद्यापीठात जमा करावी.

५. दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती महाविद्यालयाने स्वतंत्रपणे विद्यापीठामध्ये सादर करावी.

६. विद्यार्थ्याचा Login ID आणि Password हा विद्यार्थ्याच्या मुळ महाविद्यालयातूनच उपलब्ध होईल.

७. ऑनलाईन नामांकन आवेदनपत्रे तसेच ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे सादर करण्याबाबतची संपूर्ण माहिती https://sgbau.ucanapply.com या संकेतस्थळावर Technical HelpDesk Details यावर उपलब्ध आहे.

८. पोस्टाद्वारे परीक्षा आवेदनपत्रे स्विकारल्या जाणार नाही.

९. परीक्षा आवेदनपत्र भरण्याकरीता अधिसूचना क्रमांक १६/२०२१ प्रसिध्द झाले असुन त्याची प्रत सोबत जोडली आहे.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला,

(डॉ.हेमंत आर.देशमुख)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO


---

(असाधारण)

**मंगळवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०२१**

अधिसूचना

क्रमांक : १६/२०२१ दिनांक : ०२/०२/२०२१

**विषय : परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याच्या तारखांबाबत..**
**हिवाळी - २०२० परीक्षा**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता सूचित करण्यात येते की, हिवाळी-२०२० परीक्षेकरीता प्रवेशित होऊ इच्छिणाऱ्या व परीक्षेस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता परीक्षा आवेदनपत्रे भरण्याच्या / महाविद्यालयाने विद्यापीठात सादर करावयाच्या तारखा खालीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहेत.

**तक्ता अ (Online)**

| अ. क्र. | परीक्षेचे नांव | आवश्यक शुल्कासह https://sgbau.ucanapply.com/smartexam/public/ | |
|---|---|---|---|
| | | विद्यार्थ्यांनी Online परीक्षा आवेदनपत्रे भरावयाची तारीख | महाविद्यालयाने विद्यापीठात शुल्क पावत्या व Online परीक्षा आवेदनपत्रे भरलेल्या विद्याहर्थ्यांची यादी सादर करावयाची तारीख |
| १. | सत्र पद्धती अभ्यासक्रमाच्या (नियमीत) सत्र - १,३,५,७,९ च्या सर्व परीक्षा (B.E., B.Tech., B.Text.,B.Arch. परीक्षा वगळुन) | ०३-०२-२०२१ ते १२-०२-२०२१ | अमरावती व अकोला जिल्हा<br>बुलढाणा, यवतमाळ व वाशीम जिल्हा |
| २. | सत्र पद्धती अभ्यासक्रमाच्या (नियमीत) B.E., B.Tech., B.Text., सत्र १, ३ च्या परीक्षा. B.Arch सत्र १ च्या परीक्षा | ०३-०२-२०२१ ते १२-०२-२०२१ | अमरावती व अकोला जिल्हा ०१-०३-२०२१<br>बुलढाणा, यवतमाळ व वाशीम जिल्हा ०२-०३-२०२१ |
| ३. | B.A, Bcom, Bsc सत्र १, २ च्या माजी विद्यार्थ्यांच्या परीक्षा व B.E., B.Tech., B.Text.,B.Arch. मधील सर्व सत्राच्या माजी विद्यार्थ्यांच्या परीक्षा | ०३-०२-२०२१ ते १२-०२-२०२१ | अमरावती व अकोला जिल्हा ०१-०३-२०२१<br>बुलढाणा, यवतमाळ व वाशीम जिल्हा ०२-०३-२०२१ |

**तक्ता ब (Offline)**

| अ. क्र. | परीक्षेचे नांव | आवश्यक शुल्कासह | | आवश्यक शुल्क + रू. ५०/- विलंब शुल्कासह | |
|---|---|---|---|---|---|
| | | महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून ऑफलाईन परीक्षा आवेदनपत्रे स्विकारावयाची तारीख | महाविद्यालयाने विद्यापीठात शुल्क भरणा करावयाची तारीख | महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून ऑफलाईन परीक्षा आवेदनपत्रे स्विकारावयाची तारीख | महाविद्यालयाने विद्यापीठात शुल्क पावत्या व एम.कार्ड. /परीक्षा आवेदनपत्रे सादर करावयाची तारीख |
| | वार्षीक पध्दती / सत्र पद्धती अभ्यासक्रमाच्या तक्ता अ मधील परीक्षा वगळुन उर्वरीत सर्व माजी विद्यार्थ्यांच्या परीक्षा | १२-०२-२०२१ | २०-०२-२०२१ | २२-०२-२०२१ | अमरावती व अकोला जिल्हा ०१-०३-२०२१ |
| | | | | | बुलढाणा, यवतमाळ व वाशीम जिल्हा ०२-०३-२०२१ |

**महत्वाच्या सूचना :**

१. विद्यापीठ / शासन स्तरावरील प्रवेश प्रक्रियेतील विलंबामुळे ज्या परीक्षांचे प्रवेश वरील नमूद केलेल्या तारखांपूर्वी होवू शकले नाहीत अशा प्रवेशित नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे त्यांचे प्रवेशाचे तारखेपासून दहा दिवसापर्यंत स्वीकारण्यात येतील.

२. उपरोक्त परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारावयाच्या / सादर करावयाच्या अंतिम तारखेला महाविद्यालय / विद्यापीठ कार्यालयास सुटी असल्यास सदर तारखेनंतर येणारी कार्यालयीन कामकाजाची तारीख ग्राह्य धरण्यात यावी.

३. अध्यादेश क्रमांक २१/२००१ नुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांनी माजी व बहीःशाल विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारणे अनिवार्य आहे.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये.

स्वा/-
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****